# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

दिनांक २०/११/२०१० रोजी संपन्न झालेल्या सर्व सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिं.२०/११/२०१०रोजी महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.४.५० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
३. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
४. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
५. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
६. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
७. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
८. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
९. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१०. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
११. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१२. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
१३. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
१४. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
१५. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
१६. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
१७. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
१८. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
१९. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
२०. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
२१. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये

२२. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
२३. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
२४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
२५. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
२६. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
२७. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
२८. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
२९. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
३०. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
३१. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
३२. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
३३. स.स.डॉ.खान जफर अहेमद
३४. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
३५. स.स.श्री.खान आगा मिया खान
३६. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
३७. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
३८. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
३९. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
४०. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
४१. स.स.श्रीमती काथार रेखा कैलास
४२. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
४३. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
४४. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
४५. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
४६. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
४७. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
४८. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
४९. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
५०. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
५१. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

५२. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
५३. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
५४. स.स.श्री.जोशी संजय रामदास
५५. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
५६. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद
५७. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
५८. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
५९. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
६०. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
६१. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

श्री.गिरजाराम हळनोर :स.श्रीमती पुष्पा सलामपुरे यांचे वडील स्व.दगडुजी परदेशी तसेच त्यांचे सासरे स्व. भगीरथ ताराचंदजी सलामपुरे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.सुर्यकांत जायभाये :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी उभे रहावे.

याच वेळी स्व. दगडुजी परदेशी तसेच स्व. भगिरथ ताराचंदजी सलामपुरे यांना सभागृहाच्या वतीने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

चर्चा

श्री.काशिनाथ कोकाटे :स.सदस्य श्री. अफसर खॉन यांनी आजच्या सभेला गैरहजर राहण्यास परवानगी देणे बाबतचा अर्ज दिलेला आहे त्यास मंजूरी देण्यात यावी.

मा.महापौर :ठिक आहे.

मा.महापौर :आजच्या सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने उपस्थित मा.उपमहापौर, मा.सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता मा.आयुक्त, अधिकारी पत्रकार फोटोग्राफर यांचे मनपुर्वक स्वागत आजच्या सभेत मराठवाडा शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीमूळे कुठल्याही धोरणात्मक बाबीवर चर्चा न करता सभा संपन्न होणार आहे.नगरसचिव यांनी मा. जिल्हाधिकारी यांचेशी झालेल्या पत्रव्यवहाराबाबत खुलासा करावा.

नगरसचिव :शिक्षक मतदार संघाची निवडणूक २०१०ची घोषणा दि.२५-१०-२०१० रोजी करण्यात आल्यामूळे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीसाठी आचारसंहितेची अमलबजावणी काटेकोरपणे करण्यासाठी तसेच निवडणुक आयोगाने व जिल्हा निवडणुक अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनेचे पालन करणे व आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घेणे या संदर्भात मा. भारत निवडणुक आयोगाने दिनांक २०-४-२०१०च्या पत्राची प्रत आणि मागदर्शक सुचनाची प्रत

निवडणुक विभाग प्रमुख महानगरपालिका औरंगाबाद यांनी महानगरपालिकेच्या सर्व विभाग प्रमुख शाखा प्रमुख यांना दिनांक २८-१०-२०१० रोजी कळविलेले आहे. मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे सहिने मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी औरंगाबाद यांना महानगरपालिका सर्वसाधारण सभा,विशेष सभा ,तहकूब सभा आणि स्थायी समिती सभांचे आयोजन करण्या संबधी दिनांक१८-१२-२०१० रोजी सभांचे विषयासह प्रारूप कार्यक्रम पत्रिका जोडून सभांचे आयोजन करण्या बाबत मार्गदर्शन मागविलेले होते या संदर्भात मा. जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे की निवडणूक आयोग भारत सरकार यांचे पत्र दिनांक २४-२-२०१० व २०-४-२०१० मध्ये दिलेल्या सुचनेच्या अधिन राहून व शिक्षण विभागाचे कोणतेही धोरण व सवलती किंवा शिक्षक मतदार यांना लाभ होईल असा निर्णय घेता येणार नाही. तसेच आचारसंहितेचा भंग होणार नाही या अटीस अधिन राहून परवानगी देण्यात येते. मा.निवडणुक आयोग यांचे दि. २०-४-२०१० रोजीच्या पत्रातील अनु.क्र.२(८) मध्ये स्पष्ट केले आहे की महापालिकेच्या टाळता न येण्यासारखे संविधानिक बैठका घेता येतील.परंतु त्यात कोणतेही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. तसेच कोणत्याही आर्थीक बाबीस मान्यता देता येणार नाही.व फंड रिलीज करता येणार नाही.आणि या संदर्भात लोकसभा व विधानसभेच्या वेळी जी बंधने घालण्यात आलेली आहे तीच या बाबतीत लागू राहतील.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण(२)मधील नियम १ (अ)प्रमाणे प्रत्येक महिण्याच्या २० तारखेच्या आत किमान एक तरी सर्वसाधारण सभा घ्यावी अशी तरतूद आहे.करिता आपल्या माहितीस्तव.

श्री.मुजीब खान : आचारसंहितेच्या संदर्भात मा. जिल्हाधिकारी यांचेकडील माहिती प्रशासनाने घेतली व दिली. यापूर्वी अनेकदा चर्चा झाली की शासनाकडून किंवा प्रशासनाकडून जे पत्र येतील त्यांची प्रत स.सदस्यांना दयावी.१९८८ पासून मी सदस्य आहे यापूर्वी माहिती दिली जात होती ५-६ वर्षापासून दिली जात नाही आताच वाचून दाखवले तेंव्हा कळाले.ही माहिती महापालिकेकडे केंव्हा आली याची प्रत सर्व स.सदस्यांना दिली असती वाचून दाखविण्याची गरज पडली नसती. यापूढे शासनाकडून किंवा प्रशासनाकडून जे पत्र, माहिती येईल त्याची प्रत स.सदस्यांना देण्यात यावी.

श्री.संजय जोशी :यात जे दिले धोरणात्मक निर्णय धेवू नये निविदेच्या बाबतीतही आहे परंतु अगोदर मंजूरी झाली असेल तर निविदा काढण्यास हरकत नसावी.निविदा काढता येत नाही.मंजूरी होणार नाही स्थायी समितीची बैठक होणार नाही मिटींगमध्ये येणार नाही परंतु बजेटमध्ये आहे निवीदेपर्यत कार्यवाही पोहचलेली आहे तर पेपरला नोटीस देवू शकत

नाही का कोणत्या कायदयानुसार कलमानुसार देता येत नाही खुलासा करावा.

शहर अभियंता :शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीची आचारसंहिता औरंगाबाद शहराला लागू आहे.महापालिकेत जी कामे करावयाची होती त्या संदर्भात महापालिकेने निवडणूक अधिकारी यांचेकडे पत्र पाठवून माहिती घेतली मार्गदर्शन मागविले जी कामे या निवडणूकीच्या आचारसंहितेमध्ये लागू होणार नाही त्या व्यतिरिक्त कामांची व स्पेसीफिक कामांना निविदा काढण्याची परवानगी दिली आहे.जनरल असे सर्वच कामासाठी निविदा काढावी असा धोरणात्मक निर्णय घेण्यास मंजूरी दिली नाही.

श्री.संजय जोशी :नुकत्याच काही निविदा आलेल्या आहेत तेंव्हा आचारसंहिता लागलेली नव्हती का?

शहर अभियंता :त्या दुस-यांदा निविदा काढलेल्या आहे पहिल्यांदा त्या कामाच्या निविदा झालेल्या होत्या फेर निविदा करायच्या होत्या त्याची मंजूरी प्राप्त आहे.

श्री.संजय जोशी :याचा अर्थ आचारसंहिता संपेपर्यत निविदा काढणार नाही. दोन दिवसापूर्वी एका हॉटेलमध्ये स्वच्छतेच्या संदर्भात परीषद झाली त्यासंदर्भात १ ते १.५० लक्ष रू. चे बिल महापालिकेकडे आले का ?

मा.आयुक्त :घन कचरा संदर्भात मराठवाडा विभागाची कार्यशाळा होती.यामध्ये सर्व नगरपालिका, जिल्हा परिषदा, महानगरपालिका औरंगाबाद व नांदेड या सर्वाचा समावेश होता.मा. विभागीय आयुक्त यांचेशी चर्चा करून हा कार्यक्रम ठरविलेला होता.यामध्ये अलमित्रा पटेल आणि बाकीचे जे सॉलीड वेस्ट मध्ये जे अनुभवी व्यक्ती आहे त्या सर्वाचे येथे आयोजन केले होते.महानगरपालिका,नगरपालिका व संपूर्ण प्रशासनाने त्यांना मदत करावी अशी मागणी होती त्यांनी पैसे मागितले होते.त्या संदर्भात बिल आलेले नाही अदयाप काहीही रक्कम दिली नाही.मा.विभागीय आयुक्त यांनी त्यांना धनकचरा,शहर स्वच्छता आराखडयाचे काम आहे.सर्वाकडून रक्कम जमा करून देवू असे म्हटले होते

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगरसचिव
महानगरपालिका औरंगाबाद